सायं.दैनिक
बीड
# किसान
www.beedkisan.in
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक २७३ ▪ मंगळवार, दि. १० फेब्रुवारी, २०२६ ▪ पोस्टल दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-273 ▪ Tuesday 10 February, 2026 ▪ Postal Date 11 February, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## हरवलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध बीड शहर पोलिसांची तत्पर कामगिरी

बीड (किसान न्युज): बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतील एका अल्पवयीन मुलीचा तिच्या कोचिंग क्लासमधून निघून गेल्याची तक्रार प्राप्त झाली होती. या घटनेची गंभीर दखल घेत बीड शहर पोलिसांनी तात्काळ शोध मोहीम राबवली. पोलिसांनी केलेल्या जलद व प्रभावी तपासामुळे सदर अल्पवयीन मुलीचा सुरक्षित शोध घेण्यात आला असून, तिला सुखरूपपणे तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तपासादरम्यान असे निदर्शनास आले की, काही अल्पवयीन मुली सोशल मीडियाच्या माध्यमातून अनोळखी व्यक्तींशी संपर्कात येत असून, याच माध्यमातून त्यांना फूस लावून पळवून नेण्याचे प्रकार घडत आहे. पोलिसांचे पालकांना आवाहन पालकांनी आपल्या मुली काय करत आहेत कोणाच्या संपर्कात आहेत याकडे लक्ष द्यावे पालकांनी मुलींशी संवाद ठेवून त्यांना विश्वासात घ्यावे संशयास्पद चॅटिंग अथवा वर्तन आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी शाळा, कॉलेज व क्लासेसच्या संचालकांनी व शिक्षकांनीही सतर्क राहावे वेळीच माहिती दिल्यास संभाव्य अनुचित घटना टाळता येतात तसेच पोलिसाना प्रतिबंधात्मक कारवाई करणे शक्य होते. गैरवर्तन करणाऱ्या व समाजविघातक प्रवृत्तीच्या मुलांवर पोलीस कारवाई सुरू असून, या कामात पालक, शिक्षक व समाजाची सजगता अत्यंत आवश्यक आहे.


# मंजूर कर्जावर बोजा टाकून रक्कम नाही त्यावर न बोलता तोंडात 'बताशा' घेऊन बसलेल्या संचालकांनी डॉ.एपीजे अब्दुल कलाम योजनेचे नाव हटवण्याचा घेतला ठराव!

## डॉ.एपीजे अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजनेचे नाव बदलण्याच्या मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या हालचाली सुरू

**बीड । किसान न्युज**

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून व्यवसाय आणि शैक्षणिक कर्ज दिले जाते. शैक्षणिक कर्ज योजनेला मिसाईल मॅन माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजना असे नाव देण्यात आलेले आहे. आता हे नाव बदलण्याचा ठराव संचालक मंडळाने घेतला आहे. यामुळे महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे व्यवसायिक कर्ज मंजूर असून, बोजे टाकून वर्ष झाले पण अद्याप त्यांना रक्कम मिळाली नाही. यावर मात्र न बोलता संचालक मंडळ तोंडांत 'बताशा'धरुन बसले आहेत. परंतु नामकरणाचे डोहाळे लागलेल्या संचालक मंडळाला डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची लर्जी का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तर तुम्हाला संचालक पद दिले म्हणून तुम्ही त्या बदल्यात मेंदू घाण ठेवला का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

अल्पसंख्याक तरुणांना रोजगार आणि उच्च शिक्षण मिळावा यासाठी मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून कर्ज पुरवठा करण्यात येतो. व्यवसायासाठी कर्ज तर तब्बल दहा वर्षांच्या नंतर सुरू केले. पण त्यातही शेकडो व्यवसायिक कर्ज फाईल मंजूर केल्या असून, कर्जदार आणि जमानतदारांच्या मालमत्तेवर बोजा टाकण्यात आला आहे. यावा वर्ष उलटून गेले पण व्यसाय कर्ज मंजूर झालेले कर्जदार वर्षभरापासून आज रक्कम मिळेल उद्या मिळेल या प्रतिक्षेत वर्षभरापासून आहे. पण त्यांच्या हातावर फुटकी कवडी ही पडली नाही. यावर चकार शब्द न काढता मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष व संचालक मंडळ फक्त बघ्याच सोंग घेत एक शब्द न बोलता तोंडात 'बताशा' धरुन बसले आहेत. केंद्र सरकारने यासाठी रक्कम मंजूर करुन देण्याची साधी मागणीही न करणारे संचालक मंडळ केंद्राचे आदेश येताच नाव बदलण्यासाठी ठराव घेत आहेत. यामुळे संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना » पान २ वर



मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई
संचालक मंडळाची १२२ वी बैठक,
दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५ रोजी दुपारी ४.०० वा.
इतिवृत्त

मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाची १२२ वी बैठक, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीसाठी खालील मान्यवर उपस्थित होते.

१. श्री.मुस्ताक अताउल्लाह अंतुले, अध्यक्ष
२. श्री.जावेद अब्दुल खलीक शेख, उपाध्यक्ष
३. श्री.रुचेश जयवंशी (भा.प्र.से.), सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग
४. श्री.ग.पि.मगदूम, व्यवस्थापकीय संचालक
५. श्री.शेख तय्यब सिकंदर, संचालक
६. श्री.अल्ताफ दाउद पेवेकर, संचालक
७. डॉ.असगर कासम मुकादम, संचालक
८.श्री.शेख वसीम शेख अजीम, संचालक
९.श्री.अहमद शरीफ अब्दुल बासीद देशमुख, संचालक
१०. श्री.शाह आलम खान मिया खान, संचालक
११.डॉ.काझी अमिरोद्दीन काझी आरिफोद्दीन काझी, संचालक

सर्व प्रथम मा.अध्यक्ष यांनी बैठकीमध्ये सर्व संचालकांचे स्वागत केले. तद्नंतर मा.अध्यक्ष यांनी श्री.अनिल कुमार, उप महाव्यवस्थापक, राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली, श्री.मुजीब रुमाने, संचालक, व श्री.फरहान खान अहमद खान, संचालक श्री.कुलदीप सिंग सुरी, संचालक, व श्री.फारुख महमंद शेख, संचालक, मौ.आ.अ.आ.वि.महा.मर्या.मुंबई हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाल्याने त्यांचे स्वागत केले. श्री.सलिम सारंग, संचालक हे अनुपस्थित होते.

मा.अध्यक्ष यांनी दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२५ व दिनांक २५ जून, २०२५ रोजीच्या मागील दोन बैठकींचे इतिवृत्त कायम करण्यास सन्मा.संचालक मंडळाकडून मान्यता देण्यात यावी असे सुचविले, त्यावर सन्मा.संचालक, मा.उपाध्यक्ष, श्री.जावेद अब्दुल शेख व सन्मा.संचालक श्री.शेख तय्यब, श्री.अल्ताफ पेवेकर, डॉ.असगर मुकादम, श्री.शेख वसीम, श्री.शाह आलम खान, डॉ.काझी अमिरोद्दीन काझी यांनी यापुढे इतिवृत्तामध्ये बदल करण्यात येवू नयेत अशा सूचना


अखिल भारत स्तरावर राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली (NMDFC) शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेचे नाव डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजना असे संबोधण्यात यावे व त्या अनुषंगाने राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली (NMDFC) ने उचित कार्यवाही करावी, असा प्रस्ताव NMDFC स सादर करावा असे सर्वानुमते सुचविण्यात आले.

ठराव :
१)"डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजनेला यापुढे "राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम (NMDFC) शैक्षणिक कर्ज योजना" संबोधण्यात यावे असे सर्वानुमते ठरले."

२.मुदत कर्ज योजनेतील हमी शुल्क २% न घेतल्यामुळे व्याजदर ८% वरुन ६% करण्याबाबत.
NMFDC यांनी त्यांचे दिनांक १८/०९/२०२५ च्या पत्रान्वये कर्जदार लाभार्थ्याकडून ६% दराने व्याज आकारणी करण्यात यावी व २% हमी शुल्क पोटी व्याज आकारणी करण्यात येवू नये अशा सूचना केल्या आहेत.
या संदर्भात NMDFC च्या सूचनेप्रमाणे कार्यवाही व्हावी असे ठरविण्यात आले.
ठराव :
"कर्जदार लाभार्थ्याकडून ६% दराने व्याज आकारणी करण्यात यावी व २% हमी शुल्क व्याज आकारणी करण्यात येवू नये असे सर्वानुमते ठरले."

३.मिलन सॉफ्टवेअर बाबत सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याबाबत.
मिलन सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांना / अधिकाऱ्यांना मुंबई व अन्य ठिकाणी देण्यासाठी अभियंते / अधिकारी पाठवा असे राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली (NMDFC) यांस सुचविण्यात आले आहे. मिलन सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण देण्याकरिता ठिकाण व तारीख निश्चित करुन प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात येत आहे.
ठराव :
"मिलन सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण महामंडळातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना देण्यात यावे व मिलन सॉफ्टवेअर नुसार राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले."



## मुश्ताक अंतुले साहेब वडीलांच्या इज्जतीचा विचार करा

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून मुश्ताक अंतुले यांच्या खांद्यावर भार आहे. त्यांना काम कसे करावे याचा कोणाचा आदर्श घेण्याची गरज नसून त्यांचे वडील पहिले मुस्लिम मुख्यमंत्री बॅरिस्टर ए.आर. अंतुले यांचे काम आहे. त्यांनी काम कसे करावे याचे उत्तम उदाहरण असून आजही त्यांना त्यांच्या कामामुळे आणि निर्णयामुळे ओळखले जाते. नियमित त्यांना समाजाची आणि सर्वसामान्य लोकांची काळजी होती. त्यांच्या मुख्यमंत्री कार्यकाळात सामान्य माणूस केंद्रबिंदू होता हे दिसून येत. पण सामाजाच्या हिताचे काम करण्याची संधी मुश्ताक अंतुले यांना आलेली असताना ते मात्र ही संधी गमावत असून, समाजाच्या हिताचे निर्णय घेण्याऐवजी ते कोणाच्या तरी ओंजळीने पाणी पित असल्याचे दिसून येत आहे. यामुळे कोणताही निर्णय घेण्याआधी मुश्ताक अंतुले यांनी वडीलांच्या नावाचा विचार करावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## अध्यक्षांचे झेलणाऱ्यांना वेगळा अन् महाराष्ट्राला वेगळा न्याय का?

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवसायीक कर्ज फाईल मंजूर होऊन त्यावर बोजे टाकून निधी अभावी धुळखात पडून आहेत. शेकडो व्यवसायिक या कर्जाची रक्कम येईल म्हणून प्रतिक्षेत आहेत. त्यांची रक्कम आल्या शिवाय नवीन फाईल स्वीकारणे पूर्ण राज्यात बंद आहेत. असे चित्र पूर्ण महाराष्ट्राचे आहे. परंतु जालना आणि यवतमाळ हे दोन जिल्हे यास अपवाद ठरत असल्याचे दिसून येत आहेत. या जिल्ह्याचे संचालक म्हणून मिरवणारे शाह आणि काझी हे अध्यक्षाचे झेले असल्याने जालना आणि यवतमाळ मध्ये नवीन फाईल स्वीकारणे सुरू आहे. शेकडो लोकांच्या फाईल्स मंजूर होऊन त्यांना रुपया मिळाला नसताना जालण्यात नवीन ७० फाईल मंजूर करण्यात आल्या असून, त्यांना पैसा ही वाटप करण्याच्या हालचाली सुरू असल्याची खात्रीलायक माहिती आहे. जर असे झाले तर राज्यभर महामंडळ आणि संचालक मंडळाच्या विरोधात आंदोलने होण्याची शक्यता नाकारता येत नाही.


# कलेक्टरांचा वाळू टेंडर मालकाला दणका

## ७ कोटीचा दंड; वाळू घोटाळा करणाऱ्या विरोधात आवळला कारवाईचा फास; १ हजार ६८६ ब्रास वाळू उपशाचा ठपका

**बीड । किसान न्युज**

गेवराई तालुक्यातील सावरगाव व बोरगाव वाळू घाट ठेकेदारांनी टिप्पर धारकांची अडवणूक करीत एका पावतीवर अनेक खेपा करुन वाळू अवैध वाळू उपसा करुन स्वतः चे उखळ पांढरे करून घेतले. हा प्रकार समोर येताच याची कलेक्टर यांनी गंभीर दखल घेत आधी टिप्पर धारकांना दंड केला. यानंतर वाळू ठेकेदारांना ही दणका दिला असून, ठेकेदाराला ७ कोटीचा दंड ठोठावला आहे. या दंडाची नोटीस संबंधितांना आज सायंकाळपर्यंत पोचणार आहे. बीड जिल्ह्यातील केवळ गेवराई तालुक्यातील सावरगाव व बोरगाव येथे अधिकृत वाळू घाट सुरू झाले आहेत. तर इतर वाळू घाट अद्याप बंद आहेत. दोन वर्षांपासून वाळू बंद असल्याने अनेकांचे बांधकाम बंद होते. ते सुरू झाल्याने वाळूची मागणी वाढली आहे. त्यात दोनच वाळू घाट सुरू असल्याने वाळू ठेकेदाराने स्वतः चे हीत पाहत टिप्पर धारकांना पावती हवी असेल तर कोल्हापूरची पावती देऊन त्या एकाच पावतीवर तीन ट्रिप मारण्याचे फर्मान काढले होते. यासाठी टिप्पर धारकाकडून तब्बल ८० हजार रुपये घेण्यात येत होते. जर पावती नको असेल तर प्रति ट्रिप १८ हजार द्या आणि किती ही वेळा भरुन जा » पान २ वर





# तीच खुर्ची, तेच कार्यालय... मात्र अजितदादांची कायमची अनुपस्थिती

## उपमुख्यमंत्रीचा पदभार स्वीकारताना सुनेत्रा पवार भावूक, पार्थही रडले!



**मुंबई । किसान न्युज**

अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार आणि मुलं जय, पार्थ पवार यांच्यावर दु:खाचा डोंगरच कोसळला. पवार कुटुंबासाठी हा एक मोठा आघात असून, कर्तव्य प्रथम असं म्हणत पुन्हा मोठ्या ताकदीनं हे कुटुंब या दु:खातून सावरताना दिसलं. तिथं दुसरीकडे अनेक राजकीय घडामोडी आणि सत्तासमीकरणांनी वेग धरला. सुनेत्रा पवार यांच्यावर अजित पवारांच्या पदाची अर्थात महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदाची धुरा सोपवण्यात आली. शपथविधीनंतर काहीच दिवसांनी, १० फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांनी अधिकृतरित्या उपमुख्यमंत्रीपदाची सूत्र हाती घेतली आणि हा क्षण त्यांच्या मनात असंख्य भावनांचा काहूर माजवून गेल्या, ज्या अश्रूवाटे व्यक्त झाल्या आणि उपमुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातच सुनेत्रा पवारांसह पार्थ पवारही हमसून हमसून रडताना दिसले.



# बारावी परिक्षा केंद्रांना कलेक्टरांची भेट

## परिक्षा केंद्रावरील सुविधांची केली पाहणी; पोलिसांचा तगडा बंदोबस्त

**बीड । किसान न्युज**

आजपासून १२ वी च्या बोर्ड परीक्षा सुरु झाल्या आहेत. या परीक्षा कॉपीमुक्त व निर्भय वातावरणात पार पडाव्यात यासाठी कलेक्टर स्वतः लक्ष ठेवून आहेत. याच पार्श्वभूमीवर त्यांनी आज विविध परीक्षा केंद्रांना भेटी देऊन सुविधांची आणि सुरक्षेची पाहणी केली. तसेच त्रुटी बाबतीत सूचना केल्या आहेत.

बीड जिल्ह्यात आज मंगळवार (दि.१०) पासून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) च्या १०३ केंद्रावर परीक्षा सुरू आहेत. या परीक्षा कॉपीमुक्त आणि निर्भय वातावरणात पार पडावी यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. याच पार्श्वभूमीवर कलेक्टर विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यातील अनेक परीक्षा केंद्रांना अचानक भेटी दिल्या आहेत. या भेटी दरम्यान त्यांनी परीक्षा केंद्रावरील सीसीटीव्ही कॅमेरे, विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था आणि इतर सुविधा, केंद्रप्रमुख व पर्यवेक्षकांची उपस्थिती, पेपर वाटप व उत्तरपत्रिका हाताळणीची प्रक्रिया यांची सखोल तपासणी केली. कलेक्टर यांनी केंद्रप्रमुख व शिक्षकांशी संवाद साधत परीक्षा कॉपीमुक्त व शिस्तबद्ध वातावरणात पार पाडण्याच्या सूचना दिल्या. प्रशासनाकडून पुढील कालावधीतही अशाच प्रकारच्या तपासणी भेटी सुरू राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.






स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट 161,000
२२ कॅरेट 155,000
चांदी प्रतिकिलो 280,000

# १३ फेब्रुवारीला केज विधानसभा शिवसेना कार्यकर्ता मेळावा

## मंत्री संजय शिरसाठ, संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांची प्रमुख उपस्थिती

**बीड । किसान न्युज**

केज विधानसभा मतदारसंघात आगामी राजकीय हालचालींच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने शक्तिप्रदर्शनाची तयारी सुरू केली असून, माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांच्या प्रवेशानंतर मोठे शक्ती प्रदर्शन करण्यासाठी शिवसेनेचा केज विधानसभा मेळावा शुक्रवार, १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता केज येथील मुक्ताई मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. शिवसेनेच्या उपनेत्या व माजी आमदार संगीता ताई ठोंबरे, जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक,



अनिल दादा जगताप, स्वप्नील भैया गलधर यांच्या नेतृत्वाखाली मेळावा यशस्वी करण्यासाठी नियोजन सुरू आहे. संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणि आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची स्पष्ट भूमिका मांडण्यासाठी हा मेळावा महत्त्वाचा मानला जात आहे. या मेळाव्यास सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ साहेब आणि संपर्कप्रमुख मनोज शिंदे साहेब उपस्थित राहून शिवसैनिकांना मार्गदर्शन करणार आहेत. केज विधानसभा मतदारसंघात » पान २ वर